## <u>रे.मु.नं.१४६/२०१५ मधील नि.क.२८ वरील आदेश</u>

*<u>लक्ष्मण माळी, वगैरे</u>* ... *वादी*
*वि.*
*फसाबाई माळी, वगैरे* ... *प्रतिवादी*

१ सदरचा अर्ज प्रतिवादी क्र. १ ते ८ यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश ७, नियम ११(अ) व (ड) अन्वये वादीचा दावा नाकारण्यासाठी दाखल केला आहे.

२. अर्जात प्रतिवादींचे कथन की, प्रस्तुतचा दावा हा ठरावाकरीता व कायम मनाई आदेशाकरीता दाखल केला आहे. यातील वाद मिळकती या नियंत्रित सत्ता प्रकारच्या व कुळवहिवाटीच्या आहेत. त्याबाबतचा मजकूर वादीने दाव्याचे कलम ३ मध्ये नमूद केला आहे. दावा मिळकतीचे सातबारा उता-यावर देखील भोगवटदार वर्ग २ असे स्पष्टपणे नमूद केले आहे. वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान वादाची सुरुवात ही वादींचे वडील यांनी, प्रतिवादीचे वडील परशुराम यांचेपश्चात झालेल्या वारस नोंदीवरुन झाली. त्या नोंदीस वादींनी तहसिलदार कर्जत यांचेकडे लेखी हरकत घेतली. दावा मिळकती या प्रतिवादीचे वडील परशुराम यांचे ताबेकब्जात होत्या. त्यांनी मुंबई कुळ कायदा, कलम ७०ब प्रमाणे कुळ म्हणून ठरवून मिळण्यासाठी दावा दाखल केला. पुढे कुळ कायदा, कलम ३२-ग प्रमाणे दावा मिळकतीची विक्री परशुराम यांचे नावे करण्यात आली व तशी हक्कनोंद देखील झाली. सदरची हक्कनोंद व झालेला विक्रीचा आदेश या दोन्ही बाबी वादींचे वडील गपणत यांनी आजतागायत आव्हानित केलेल्या नाहीत, पण प्रतिवादीचे वडीलांचे पश्चात झालेल्या प्रतिवादींचे नावाची नोंद वादींनी आव्हानित केली आहे. त्या प्रकरणाचा अंतिम निर्णय अप्पर आयुक्त कोकण विभाग यांनी दिला असून वादीचा फेरतपासणी अर्ज फेटाळला आहे व अप्पर जिल्हाधिकारी, रायगड यांनी दिलेला आदेश कायम केलेला आहे. तरी देखील वादींनी हा प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे. अप्पर आयुक्त कोकण विभाग यांनी फेरफार क्र. ६२५ सदोष असल्याचे

निरीक्षण नोंदविले आहे. त्यामुळे या दाव्यास आता कोणतेही कारण उरलेले नाही. या कारणास्तव वादीचा दावा दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश ७, नियम ११अ अन्वये नाकारण्यास पात्र आहे.

३. प्रतिवादीचे पुढे असे कथन की, वाद मिळकती या कुळ वहिवाटीच्या व नियंत्रित सत्ता प्रकारच्या असल्याने, वादी प्रतिवादी दरम्यानचा वाद हा महाराष्ट्र कुळ वहिवाट व शेतजमीन अधिनियम कायदयातील तरतुदींशी संबंधीत आहे. त्यामुळे वादी मागत असलेल्या मागण्या या केवळ महसूली न्यायालयाकडेच मागता येतात. कुळ वहिवाटीसंदर्भातील वाद हे दिवाणी न्यायालयाचे अधिकारक्षेत्राचे बाहेरील आहेत. या वादास महाराष्ट्र कुळ वहिवाट व शेतजमीन अधिनियम, कलम ८५ चा रोध आहे. त्यामुळे वादीचा दावा दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश ७, नियम ११ड प्रमाणे नाकारण्यास पात्र आहे.

४. प्रतिवादीचे पुढे असे कथन की, वाद मिळकती या प्रतिवादीचे वडील परशुराम यांना ३२-ग प्रमाणे सन १९८३ साली विक्री केल्या. पण त्याबाबत आजतागायत वादीचे वडील किंवा वादी यांनी तक्रार केलेली नव्हती आता सन २०१५ मध्ये हा दावा दाखल केला आहे. तसेच सर्व्हे नं.२१/७ या मिळकतीसंदर्भात दि.२८/१२/१९९९ रोजी प्रतिवादी क्र.८ चे लाभात खरेदीखत करुन दिले आहे, ते वादीने मागील १५ वर्षामध्ये आव्हानित केलेले नाही. या दोन्ही कारणास्तव वादीचा दावा मुदतबाहय आहे. वरील सर्व कारणास्तव वादीचा संपूर्ण दावा नाकारण्यात यावा. प्रतिवादीने त्यांचे कथनाचे पुष्टयर्थ्य नि.क्र.२९ वर प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे.

५. सदर अर्जास वादीने नि.क्र.३१ वर म्हणणे दाखल करुन अर्ज नाकारला आहे. वादीचे कथन की, दाव्यातील विषय हा कुळ व सावकर यांचेमधील नाही.

सदरचा दावा हा मुंबई कुळ वहिवाट व शेतजमीन अधिनियम या मधील कोणत्याही तरतुदीनुसार दाखल केलेला नाही. सदरचा दावा हा योग्य त्या मुदतीत दाखल केला आहे. दाव्यातील मागण्यांचा विचार करता वादी मालकीहक्क ठरावाकरीता व कायमचे मनाई हुकूमाकरीता दाद मागत आहेत. यामध्ये वादी कुठेही कुळ घोषित करुन मागत नाहीत किंवा त्यांचे नावे किंमत ठरवून मिळावी अशी देखील त्यांची मागणी नाही. त्यामुळे कुळ कायदा कलम ८५ चा कोणताही रोध दाव्यास येत नाही. दिवाणी न्यायालयास सदरचा वाद मिटविण्याचा पूर्ण अधिकार आहे.

६. वादीचे पुढे असे कथन की, दावा मिळकती या वादी व प्रतिवादी यांचे पूर्वाधिकारी गणपत व परशुराम यांचे हिंदू एकत्र कुंटुंबाच्या मिळकती होत्या. सन १९७६ चे सुमारास गणपत व परशुराम या दोन्ही भावात रितसर वाटप झाले. वाटपात अर्धा हिस्सा गणपत व अर्धा हिस्सा परशुराम यास देण्यात आला व त्याप्रमाणे फेरफार क्र.६२५ मंजूर झालेला आहे. वाटपानुसार दावा मिळकतीपैकी अर्धा हिस्सा गणपत यांचे मृत्युनंतर वादीचे मालकीच्या व ताबेकब्जाच्या मिळकती आहेत असा ठराव करुन मिळण्यासाठी हा दावा आहे. त्यामध्ये कोठेही कुळ कायदयाचा संबंध येत नाही. तसेच ठरावाचे अनुशंगाने प्रतिवादींनी दावा मिळकतीत त्रयस्थ इसमांचे हक्क प्रस्थापित करु नये व वादींना कोणत्याही प्रकारे हरकत/अडथळा करु नये म्हणून मनाई हुकूमाची मागणी केली आहे. या दोन्ही मागण्या दिवाणी न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रातील आहेत.

७. वादीचे पुढे असे कथन की, दावा मिळकतीचा ताबेकब्जा १९७६ पासून वादीचे पूर्वाधिकारी व वादी यांचेकडेच आहे. डिसेंबर २०१५ पर्यंत प्रतिवादींनी त्यास हरकत केलेली नव्हती. त्यानंतर सातब-यास केवळ प्रतिवादींचीच नावे आहेत याचा गैरफायदा घेवून प्रतिवादी गि-हाईक आणून सदर जमीनी त्रयस्थ इसमास दाखवू लागले व वादीचे ताबेकब्जास हरकत/अडथळा करु लागले, तेंव्हा प्रथम दाव्यास

कारण घडले. त्यानंतर लगेचच वादीने मुदतीत दावा दाखल केला आहे. त्यामुळे मुदतीच्या कायदयाची बाधा येत नाही. वादीने, प्रतिवादीचे पूर्वाधिकारी परशुराम यांचे नावे झालेल्या किंमतीचा आदेश आव्हानित केलेला नाही. त्यामुळे या दाव्यास कुळ कायदयाची बाधा येत नाही. तसेच प्रतिवादी क्र. ८ चे लाभात झालेले खरेदीखत हे वादीचे हिश्यावर बंधनकारक नाही असा ठराव करुन मागितला आहे. सदरचे खरेदीखत वादीने रद्द करुन मागितलेले नाही. प्रतिवादी क्र. ८ यांचेविरुध्द सदरचा दावा एकतर्फा चाललेला आहे. त्याबाबत तक्रार करण्याचा इतर प्रतिवादींना कोणताही अधिकार नाही. सदरचा दावा हा केवळ ठराव करुन मागितलेला असल्याने तो मुदतीत आहे. त्यामुळे वादीचे कथन की, वर नमूद केलेल्या बाबीप्रमाणे हा दावा मुदतीत असून या न्यायालयाचे अधिकारक्षेत्रात आहे. अशा स्थितीत प्रतिवादीचा अर्ज नामंजूर करणेत यावा.

८. अर्ज, म्हणणे तसेच दाव्याचे अवलोकन केले. युक्तिवादा दरम्यान वादी वकीलांनी नि.क्र.३३ चे लिस्टपोटी काही कागदपत्रे दाखल केली. ज्यामध्ये प्रतिवादीनी अप्पर जिल्हाधिकारी, रायगड-अलिबाग यांचेकडे दाखल केलेले आर. टी.एस. अपिलाची प्रत तसेच आयुक्त कोकण विभाग यांचेकडे प्रतिवादीने दाखल केलेल्या जबाबाची प्रत दाखल केली आहे.

९. वादी, प्रतिवादी वकीलांचा युक्तिवाद ऐकला. प्रतिवादी वकीलांचे कथन की, दावा मिळकतीच्या साताबारा उता-यावर भूधारणा पध्दतीमध्ये ‘भोगवटदार वर्ग २’ असे नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे या मिळकती या कुळ मिळकती आहेत. वादी, प्रतिवादी दरम्यानचा वाद, कुळ मिळकतीशी निगडीत असल्याने त्यास कुळ कायदा कलम ८५ चा रोध आहे. त्यामुळे दिवाणी न्यायालयास हा दावा चालविता येणार नाही. तसेच प्रतिवादींचे पूर्वाधिकारी परशुराम यांचे नावे १९८३ साली दावा मिळकतीचे खरेदीदार म्हणून नोंद झाली, तेंव्हापासून आजतागायत वादीने ती

आव्हानित केली नाही. त्याचप्रमाणे प्रतिवादी क्र. ८ यांचेशी झालेला व्यवहार हा १९९९ साली झालेला आहे व आता सन २०१५ मध्ये वादी तो आव्हानित करीत आहेत. वादी, प्रतिवादीमधील वादाबाबत महसूल न्यायालयाने अंतिमत: निर्णय दिलेला आहे व वादींनी, प्रतिवादींचे नावाची करण्यात आलेली नोंद आव्हानित केली असताना त्यांचेविरुध्द निकाल देण्यात आलेला आहे. त्यामुळे आता दाव्यास कोणतेही कारण उरलेले नाही. कारण नसताना हा दावा दाखल केल्याने दाव्यास दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश ७, नियम ११(अ) व (ड) या तत्वाचा रोध येत आहे. त्यामुळे सदरचा दावा चालणेस पात्र नाही.

१०. याउलट वादी वकीलांचे कथन की, वादी हे कुळ आहेत असे जाहिर करुन मागत नाहीत. त्यांचे दाव्याचे अवलोकन करता वादीचे व प्रतिवादीचे पूर्वाधिकारी गणपत व परशुराम यांचे पूर्वाधिकारी जैतू यांचेकडेच सदर मिळकती कुळ वहिवाटीप्रमाणे होत्या. त्यानुसार गणपत व परशुराम यांचेत वाटप झाल्यानुसार फेरफार क्र.६२५ तयार करण्यात आला व दावा मिळकती या वादीचे पूर्वाधिकारी गपणत यांचे कब्जात आल्या. पण त्याचा अंमल सातबारा उता-यावर देण्यात आला नव्हता व दावा मिळकतीस केवळ परशुराम यांचेच नाव राहिले. परशुराम मयत झाल्यावर प्रतिवादींनी वारस म्हणून त्यांचे नावाची नोंद केल्यावर वादींनी त्यास हरकत घेतली. सदरचा वाद जरी महसूल न्यायालयात अंतिमरित्या निकाली झाला असला तरी फेरफार क्र.६२५ अन्वये वादी, दावा मिळकतीचे मालक आहेत असे जाहिर करुन मिळण्यासाठी वादीनी हा दावा दाखल केला आहे. दावा मिळकती या पूर्वीपासून वादींचेच ताबेकब्जात असल्याने यापूर्वी हरकत करण्याचा कोणताही संबंध उद्‌भवला नाही. पण डिसेंबर २०१५ मध्ये प्रतिवादींनी दावा मिळकती विक्रीस काढल्यावर वादींनी त्याबाबत दावा दाखल करणे योग्य समजले आहे. त्यामुळे वादींचा दावा हा मुदतीत आहे. तसेच प्रतिवादींनी या दाव्यात व महसूल न्यायालयासमोर केलेल्या वादकथानात तफावती आहेत. महसूल न्यायालयापुढे

दिलेल्या वादकथनामध्ये ते स्वत:हून सदरचा वाद हा वाटपाबाबतचा असल्याने दिवाणी न्यायालयास अधिकारक्षेत्र आहे असे कथन करीत आहेत व या न्यायालयात पुन्हा सदरचा वाद हा कूळवहिवाटीबाबत असल्याने दिवाणी न्यायालयास अधिकारक्षेत्र नाही असे कथन करीत आहेत. अशी परस्परविरोधी कथने ते करीत आहेत, त्यामुळे त्यांचा अर्ज टिकणारा नाही.

११. हे सर्वमान्य आहे की, दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश ७, नियम ११ प्रमाणे अर्ज निकाली करतेवेळी न्यायायलाने केवळ वादीचा दाव्याचा विचार करावा. सकृतदर्शनी दावा या न्यायालयास चालविण्याचे अधिकारक्षेत्र आहे असे आढळून आल्यास नियम ११ प्रमाणे दावा काढून टाकता येणार नाही. त्याचप्रमाणे जर मुदतीच्या कायदयाची बाधा येते असा जर प्रतिवादींचा बचाव असेल तर त्यासाठी मुख्य मुद्दा काढून तो पुराव्याअंती निर्णयीत करणे योग्य राहील. माझे या मतासाठी मी खालील न्यायनिर्णयावर भिस्त ठेवीत आहे.

*Elmano Menino Dias Vs. Archbishop and others, 2008(5), Mh.L.J., Page 18,. In this judgment it is held that " It is well settled that for rejecting the plaint under Order 7, Rule 11 of the Code of Civil Procedure what is required to be seen is the averments made in the plaint and not beyond that and if it is found from the averments made in the plaint that the suit is barred by law of limitation or for that matter as prescribed in Rule 11(d) of Civil Procedure Code, then alone the plaint can be rejected. If there is any slightest doubt and the point is arguable, the plaint cannot be rejected under Order 7, Rule 11(d) of Civil Procedure Code.*

Further - ***Rejection of plaint*** - *When there is an issue which needs to be decided by the Court at the final hearing, it will not provide the ground for*

*rejection of the plaint under Order 7, Rule 11 of Civil Procedure Code - When the contention was raised that the Limitation Act would apply, the dispute will have to be decided at final trial and not at the stage of application under Order 7, Rule 11 of Civil Procedure Code.*

१२. प्रतिवादींचे कथन की, या दाव्यास कुळ कायदा कलम ८५ चा रोध येत आहे. सोयीसाठी मी सदर कलम खाली नमूद करीत आहे.

*__कुळ कायदा, कलम ८५__* – *__अधिकारितेस रोध__* –

(१) या अधिनियमान्वये किंवा तदनुसार, मामलेदाराने किंवा न्यायाधिकरणाने किंवा व्यवस्थापकाने किंवा अपिलात किंवा पुनरीक्षणात जिल्हाधिका-याने किंवा (महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाने) किंवा आपल्या नियंत्रण अधिकारांचा वापर करुन राज्य शासनाने जे कोणतेही प्रश्न ( त्यात एखादी व्यक्ती कूळ आहे किंवा पूर्वी कोणत्याही वेळी कूळ होती किंवा कसे आणि कोणत्याही वेळी अशा कुळाने, त्याने धारण केलेली जमीन आपल्या जमीनमालकाकडून खरेदी केली असल्याचे मानण्यात आले आहे किंवा मानण्यात आले पाहिजे किंवा कसे या प्रश्नाचा यात समावेश होते) ठरवावयाचे, निर्णित करावयाचे किंवा विचारात घ्यावयाचे असतात ते ठरविण्याची, त्यावर निर्णय देण्याची किंवा त्यांचा विचार करण्याची कोणत्याही दिवाणी न्यायालयास अधिकारिता असणार नाही.

(२) मामलेदार, न्यायाधिकरण, जिल्हाधिकारी किंवा महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण किंवा (राज्य) शासन यांनी या अधिनियमान्वये दिलेल्या कोणत्याही आदेशावर, कोणत्याही दिवाणी किंवा फौजदारी न्यायालयात आक्षेप घेता येणार नाही.

१३. या कलमाचे अवलोकन करता कुळ जाहीर करणे व त्याच्याशी निगडीत बाबीसाठी दिवाणी न्यायालयाचे अधिकार्क्षेत्र काढून घेण्यात आले आहे.

१४. वर नमूद केल्याप्रमाणे दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश ७, नियम ११ चा अर्ज पहाण्यासाठी वादीचा दावा पहाणे गरजेचे आहे. वादीचे मागण्यांचा विचार करता वादी फेरफार क्र.६२५ ने दावा मिळकतीचे मालक झाले असे जाहिर करुन मागत आहेत व प्रतिवादीनी त्यांचे ताबेकब्जास हरकत/अडथळा करु नये म्हणून त्यांचेविरुध्द निरंतर ताकीद मागत आहेत. यामध्ये कुठेही वादी स्वत:ला कुळ म्हणून घोषीत करुन मागत नाहीत किंवा ३२-ग खाली केलेल्या प्रक्रिया ही आव्हानित करीत नाहीत. त्यामुळे वादीने दाव्यात केलेल्या मागण्या या दिवाणी न्यायालयाचे अधिकारक्षेत्रात येत आहेत. अशा स्थितीत या दाव्यास कुळ कायदा कलम ८५ चा रोध येत नाही.

१५. प्रतिवादीचे पुढे असे कथन की, वादी प्रतिवादीमधील नोंदीबाबतचा वाद सक्षम महसूल न्यायालयाने अंतिमरित्या निकाली केलेला आहे. त्यामुळे त्याच कारणासाठी वादींना पुन्हा दावा दाखल करण्याचे काहीही कारण नाही. त्यामुळे वादीचे दाव्यास दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश ७, नियम ११अ ची बाधा येत आहे. या घडीला असे भासत आहे की, जरी महसूल न्यायालयातील वरिष्ठ न्यायालयाने त्याबाबत निकाल दिला असला तरी फेरफार क्र.६२५ ही रदद झाली असे कुठेही नमूद करण्यात आलेले नाही व त्याचआधारे वादीनी सदरचा दावा दाखल केला आहे. महसूल न्यायालय व दिवाणी न्यायालय हे स्वतंत्र अशी न्यायाधिकरणे आहेत. त्यामुळे या घडीला वादींनी दाखल केलेला दावा चालणेस पात्र नाही असे म्हणता येणार नाही. पुराव्याअंती अंतिम निकालावेळी त्याबाबत निर्णय देण्यात येईल.

१६. प्रतिवादीचे कथन की, दाव्यास मुदतीचे कायदयाची बाधा येत आहे. पण वर नमूद केलेल्या न्यायनिर्णयाप्रमाणे सकृतदर्शनी दावा मुदतीत भासत असेल तर तो काढून न टाकता त्याबाबतचा मुददा काढून पुराव्याअंती दावा निकाली

काढता येईल. वादीने दाव्यात नमूद केलेले कारण व त्यानंतर दाखल केलेला दावा हा सकृतदर्शनी मुदतीत भासत आहे. त्यामुळे या घडीला दावा रदद करण्याऐवजी त्याबाबतचा स्वतंत्र मुददा काढून पुराव्याअंती अंतिम निर्णयावेळी निकाली करण्यात येईल. या सर्व कारणास्तव प्रतिवादीचा अर्ज या घडीस नामंजूर होणेस पात्र आहे.

## आदेश

१. अर्ज नामंजूर करणेत येत आहे.

कर्जत (शु.भि.यादव)
दि.१७/१०/२०१६ सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, कर्जत.